२ गोलंदाजांनी २० विकेट्स घेत गाजवली टेस्ट!

◆ नवी दिल्ली(वृत्तसंस्था) :

पाकिस्तानच्या संघाने तब्बल १३३८ दिवसांच्या प्रतिक्षेनंतर घरच्या मैदानात कसोटी सामना जिंकला. मुल्तान क्रिकेट स्टेडियमवर रंगलेल्या सामन्यातील विजयासह पाकिस्तानच्या संघाने इंग्लंड विरुद्धच्या ३ सामन्यांच्या कसोटी मालिकेत १-१ अशी बरोबरी साधली आहे. पाकिस्तान दौऱ्यावर इंग्लंडच्या संघाने शानदार विजयाने सुरुवात केली होती. पण बेन स्टोक्सच्या कमबॅक टेस्ट मॅचमध्ये इंग्लंडला पराभवाचा दणका बसला. इंग्लंडच्या संघानं दुसरा कसोटी सामना १५२ धावांनी गमावला. या कसोटी सामन्यातील सर्वात लक्षवेधी गोष्ट ही की, पाकिस्तानच्या ताफ्यातील फक्त दोन गोलंदाजांनी इंग्लंडच्या फलंदाजांची अवस्था पळताभुई थोडी करून ठेवली. मुल्तानच्या मैदानातील दुसऱ्या कसोटी सामन्यात पाकिस्तानच्या ताफ्यातील दोन गोलंदाजांनी मिळून इंग्लंड संघाच्या एकूण २० विकेट्स घेतल्या. कसोटी क्रिकेटच्या इतिहासात ५२ वर्षांनी असा कमालीचा योगायोग पाहायला मिळाला. पाकिस्तानकडून साजिद खान याने इंग्लंडच्या पहिल्या डावात ७ विकेट्स घेतल्या. दुसरीकडे नोमानला या डावात ३ विकेट्स मिळाल्या. दुसऱ्या डावात नौमान अलीनं इंग्लडच्या ८ गड्यांना तंबूत धाडले, तर यावेळी साजिद खानला २ विकेट्स मिळाल्या. शान मसूदच्या नेतृत्वाखाली पाकिस्तानच्या पहिल्या विजयात या दोन गोलंदाजांनी खास कामगिरीसह इतिहास रचला.

वेचक

अर्णव खर्डेकरला विजेतेपद; पहिली अखिल भारतीय फिडे रेटिंग बुद्धिबळ स्पर्धा

मुंबई (प्रतिनिधी) : मुंबईच्या अर्णव खर्डेकरने एसएमसीए चेस स्कूल आयोजित पहिल्या अखिल भारतीय फिडे रेटिंग खुल्या बुद्धिबळ स्पर्धेवर नाव कोरले. रशियन हाऊस, पेडर रोड, मुंबई येथे खेळल्या गेलेल्या स्पर्धेच्या आठव्या आणि अंतिम फेरीनंतर बुधवारी सायंकाळी खर्डेकर आणि मुंबईचाच आयएम विक्रमादित्य कुलकर्णी यांचे प्रत्येकी ७.५ गुण झाले. त्यानंतर चांगल्या टायब्रेकर स्कोअरमुळे खर्डेकरला विजेता घोषित करण्यात आले. दुसऱ्या बोर्डवर, खर्डेकरने मुंबईच्या दर्श शेट्टीचा पराभव करून अव्वल स्थानासाठी दावेदारी पेश केली. टॉप बोर्डवर, कुलकर्णीने विजयी मालिका कायम ठेवताना अथर्व सोनीला पराभूत केले. अर्णवने इतक्याच गुणांची कमाई केली. तुलनेत कमी प्रोग्रेसिव्ह स्कोअरमुळे विक्रमादित्य दुसऱ्या क्रमांकावर राहिला.

इंग्लंड विरुद्ध पाकिस्तानचा चार दिवसांत दमदार विजय; मालिकेत १-१ ची बरोबरी

◆ नवी दिल्ली (वृत्तसंस्था) :

एकीकडे भारताच्या संघाची न्यूझीलंड विरुद्ध कसोटी मालिका सुरू आहे, तर दुसरीकडे शेजारील देश आणि भारताचा कट्टर प्रतिस्पर्धी पाकिस्तानची इंग्लंडविरुद्ध कसोटी मालिका सुरू आहे. ज्याप्रकारे भारताच्या संघाची न्यूझीलंडने सुरू असलेल्या मालिकेच्या पहिल्या सामन्यात अवस्था केली आहे तशाच प्रकारे इंग्लंडने पाकिस्तनाची मालिकेच्या पहिल्या सामन्यात केली होती. पहिल्या सामन्यांमध्ये पाकिस्तानला घरच्या मैदानावर इंग्लंडने एकतर्फी विजय मिळवून दिला होता. मालिकेची पहिली कसोटीही मुलतानमध्ये खेळली गेली. त्यानंतर या मालिकेचा दुसऱ्या सामन्यामध्ये पाकिस्तानच्या संघाने दमदार कमबॅक करत मालिकेच्या दुसऱ्या सामन्यात इंग्लंडचा १५२ धावांनी पराभव केला आहे. यामध्ये आता पाकिस्तानच्या संघाने विजय मिळवून बरोबरी साधली आहे. मुलतानच्या सपाट खेळपट्टीवर ५५६ धावांचा डोंगर उभारूनही अनपेक्षित पराभवाला सामोरं जावं लागलेल्या पाकिस्तानने अवघ्या तीन दिवसांत किमयागार असा विजय मिळवला आहे. विशेष म्हणजे त्याच मुलतानच्या भूमीवर पाकिस्तानने बॅझबॉल पवित्र्यासह खेळणाऱ्या इंग्लंडला चीतपट करण्याची किमया केली आहे. या विजयामुळे तीन सामन्यांची मालिका १-१ अशा बरोबरीत आहे. मुलतान येथे झालेल्या पहिल्या कसोटीत पाकिस्तानने पहिल्या डावात ५५६ धावांची मजल मारली. प्रत्युत्तरादाखल खेळताना इंग्लंडने ८२३ धावा करत पाकिस्तानला नामोहरम केले. तर तिसरी कसोटी रावळपिंडी इथे होणार आहे.

साजिद - नोमानच्या जोडीने सांभाळली संघाची धुरा

सईम अयुबवर ठेवला विश्वास

सलामीवीर सईम अयुबची कामगिरी पहिल्या कसोटीत तसंच बांगलादेशविरुद्धच्या मालिकेत चांगली झाली नव्हती. पण संघव्यवस्थापनाने सईमवर विश्वास ठेवला. सईमने या संधीचं सोनं करत पहिल्या डावात ७७ धावांची संयमी खेळी साकारली. पाकिस्तानने पहिल्या डावात ३६६ धावांची मजल मारली. सईमच्या खेळीने या धावसंख्येचा पाया रचला गेला. मॅथ्यू पॉट्स, ब्रायडन कार्स आणि जॅक लिच, शोएब बशीर या आक्रमणाचा सामना करत सईमने अर्धशतकी खेळी केली. दुसऱ्या डावात त्याने २२ धावा केल्या.

टीका-ट्रोलिंगकडे दुर्लक्ष, नवीन निवड समिती

कर्णधार शान मसूदची कर्णधारपदावरून तत्काळ हकालपट्टी व्हावी असा सूर होता. पाकिस्तानचे माजी खेळाडू, युट्यूबर्स, चाहते यांनी सोशल मीडियावर संघावर जोरदार टीका केली. जगभरातल्या क्रिकेट चाहत्यांनी पाकिस्तानच्या खेळाला उद्देशून मीम्स तयार केले; परंतु पाकिस्तानच्या संघाने खचून न जाता दिमाखात पुनरागमन केले. कर्णधार शान मसूदने पहिल्या कसोटीनंतर बोलताना काळजीपूर्वक मांडणी केली. त्याने पराभवाचे खापर कोण्या एका खेळाडूवर फोडले नाही. त्या अनपेक्षित पराभवानंतर पाकिस्तानने निवड समितीच बदलून टाकली. नव्या रचनेत आकिब जावेद, अलीम दार, अझर अली, असाद शफीक आणि हसन चीमा हे निवड समितीचा भाग झाले. या पाच सदस्यीय निवड समितीने निवडलेल्या संघानेच चमत्कार घडवत विजय मिळवून दिला.

सलमान अघाची महत्त्वपूर्ण खेळी

सातव्या क्रमांकावर फलंदाजीला येणाऱ्या फलंदाजाला तळाच्या मंडळींना घेऊन खेळावे लागते. स्ट्राईक आपल्याकडे राहील यासाठी नियोजन करावं लागतं. गेल्या ३ वर्षांत सलमान अघा हा पाकिस्तानसाठी कसोटीतला महत्त्वाचा खेळाडू ठरला आहे. सातव्या क्रमांकावर फलंदाजी, उपयुक्त फिरकी आणि उत्तम क्षेत्ररक्षण ही सलमान अघाची गुणवैशिष्ट्यं आहेत. अघाने पहिल्या डावात ३१ तर दुसऱ्या डावात ६३ धावांची महत्त्वपूर्ण खेळी साकारली. दुसऱ्या डावातील खेळीमुळेच पाकिस्तानला इंग्लंडसमोर आव्हानात्मक लक्ष्य ठेवता आलं. कठीण अशा खेळपट्टीवर सलमान अघाने जिद्दीने खेळ केला.

विराट कोहली - सर्फराज खान यांची तुफान फटकेबाजी

टीम इंडिया अजूनही १२५ धावांनी पिछाडीवर

◆ नवी दिल्ली (वृत्तसंस्था) :

भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील तीन सामन्यांच्या कसोटी मालिकेतील पहिला सामना बेंगळूरु येथे सुरू आहे. पहिला दिवस पावसामुळे वाहून गेला. भारतीय फलंदाजांनी बंगळूरुच्या चिन्नास्वामी स्टेडियमचे मैदान गाजवले. दुसऱ्या दिवशी रोहित शर्माने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. भारतीय फलंदाजांनी न्यूझीलंडच्या गोलंदाजांपुढे शरणागती पत्करली आणि ते अवघ्या ४६ धावांत गार झाले. न्यूझीलंडकडून गोलंदाजीत मॅट हेन्रीने ५, तर विल्यम ओ'रुर्कने ४ विकेट घेतल्या होत्या. प्रत्युत्तरात न्यूझीलंडने पहिल्या डावात ४०२ धावा केल्या. त्यात न्यूझीलंडने ४०२ धावांचा डोंगर उभा करून पहिल्या डावात ३५६ धावांची आघाडी घेतली. आता भारताचं काही खरं नाही, असंच वाटत होते. पण, रोहित शर्मा व यशस्वी जैस्वाल यांनी सकारात्मक सुरुवात करून दिली. त्यानंतर विराट कोहली-सर्फराज खान या जोडीने तुफानी कामगिरी केली. या दोघांनी तिसऱ्या विकेटसाठी शतकी भागीदारी करून न्यूझीलंडचे टेंशन वाढवले.

बंगळूरु कसोटीच्या तिसऱ्या दिवसाचा खेळ संपला आहे. तिसऱ्या दिवसाचा खेळ संपला तेव्हा भारताची धावसंख्या ३ बाद २३१ धावा आहे. आता पहिल्या डावाच्या आधारे भारत न्यूझीलंडपेक्षा १२५ धावांनी मागे आहे. तिसऱ्या दिवशी भारताकडून विराट कोहली आणि सरफराज खान यांनी शानदार फलंदाजी केली. दोन्ही खेळाडूंमध्ये १३६ धावांची भागीदारी झाली. विराट कोहलीने १०२ चेंडूत ६८ धावा केल्या.

याआधी भारताचा सलामीवीर यशस्वी जैस्वाल आणि रोहित शर्मा यांच्यात ७२ धावांची भागीदारी झाली होती. यशस्वी जैस्वाल ३५ धावा करून पॅव्हेलियनमध्ये परतली. यशस्वी जैस्वालला एजाज पटेलने बाद केले. यानंतर भारतीय कर्णधार रोहित शर्मा ६३ चेंडूत ५२ धावा करून बाद झाला. रोहित शर्मा एजाज पटेलच्या गोलंदाजीवर बाद झाला. न्यूझीलंडकडून आतापर्यंत एजाज पटेलने २ बळी घेतले आहेत, तर ग्लेन फिलिप्सने विराट कोहलीची महत्त्वाची विकेट घेतली. सरफराज खान सात चौकार आणि तीन षटकारांच्या मदतीने ७८ चेंडूत ७० धावा केल्यानंतर क्रीजवर उभे आहेत.

पश्चिम रेल्वे-वडोदरा विभाग

सिग्नलिंग गिअर्सच्या बदलण्याच्या संदर्भात विविध कामे

ई-निविदा सूचना क्र. **बीआरसी_एसएनटी_डब्ल्यू_ २४-२५_०१ दिनांक : १५-१०-२०२४**

उप सीएसटीई (कार्य)/ वडोदरा हे भारताच्या मा. राष्ट्रपतींकरीता व त्यांच्या वतीने कार्यरत असून **निविदा क्र. बीआरसी_ एसएनटी_ डब्ल्यू_ २४-२५_ ०१** करीता ई-निविदा मागवित आहेत. बोलीदारांना केवळ निविदा बंद होण्याच्या तारीख आणि वेळेपर्यंतच त्यांच्या मुळ/ सुधारीत बोली सादर करता येतील. सदर निविदे समक्ष मॅन्युअल प्रस्तावांना अनुमती असणार नाही आणि अशा स्वरूपात प्राप्त झालेले प्रस्ताव दुर्लक्षित केले जातील. **(१) कामाचे वर्णन आणि त्याचे ठिकाण :** वडोदरा विभाग, पश्चिम रेल्वेच्या इंटोला, पालेज आणि गेरतपूर (०३) स्टेशनच्या अंतर्गत जुन्या झालेल्या इनडोअर आणि आउटडोअर सिग्नलिंग गिअर्सच्या बदलण्याच्या संदर्भात इंटोला, पालेज आणि गेरतपूर (०३) स्टेशन अंतर्गत आउटडोअर सं. आणि दूर. कामासह इलेक्ट्रॉनिक इंटरलॉकिंग (ई. आय.) प्रणालीची रचना, पुरवठा, स्थापना, चाचणी आणि कार्यान्वयन करण्याचे काम. **(२) कामाचे अंदाजित मूल्य :** रु. २०,५९,३०,४२८.२४/- **(३) जमा करावयाची बोली सुरक्षा/ इसारा रक्कम :** रु. ११,७९,७००.००/- **(४) ई-निविदा सादर करण्याकरीता आणि ई-निविदा उघडण्याकरीता तारीख व वेळ :** दिनांक ११/११/२०२४ रोजी १५:०० वाजता आणि दिनांक ११/११/२०२४ रोजी १५:३० वाजता निविदा उघडली जाईल. **(५) संकेतस्थळ तपशील आणि जेथून सूचनेचा संपूर्ण तपशील पाहता येईल ते ठिकाण इत्यादी :** http://www.ireps.gov.in उप मुख्य संकेत आणि दूरसंचार अभियंता (कार्य), दुसरा मजला, विस्तारीत इमारत, म.रे.प्र. यांचे कार्यालय, पश्चिम रेल्वे, प्रतापनगर, वडोदरा - ३९० ००४. BRC-206

आम्हाला फॉलो करा: twitter.com/WesternRly

प्रहार मंथन

त्याग कुणाचा, लाभ कुणाला?

स्टेटलाइन : डॉ. सुकृत खांडेकर

मोरपीस - पूजा काळे

दी लेडी बॉस - अर्चना सोंडे

मायभाषा - डॉ. वीणा सानेकर

प्रहार मंथन : रविवार, २० ऑक्टोबर २०२४ रोजी
मुंबई, नाशिक, रत्नागिरी, सिंधुदुर्ग येथून एकाच वेळी प्रसिद्ध

प्रहार व्यासपीठ

निवडणुकीच्या तोंडावर 'मोफत'च्या योजनांचा वर्षाव म्हणजे लाच...

बऱ्याच वेळा निवडणुकांमध्ये आपल्या पक्षाला मत देण्यासाठी पैसे दिले जातात, मात्र या वेळेस तसे न होता निवडणुकांपूर्वीच विविध योजना राबवल्या गेल्या आहेत. या योजनांबाबत सुप्रीम कोर्टाने केंद्र सरकारसह निवडणूक आयोगाला नोटीस बजावत योजनांसंबंधी भूमिका मांडण्यास सांगितले आहे.

याबद्दल तुम्हाला काय वाटते...

पत्र पाठविण्याची अंतिम तारीख : शनिवार (२० ऑक्टोबर) सायंकाळी ५ वाजेपर्यंत. शब्दमर्यादा २०० शब्द
ई-मेल : prahaarvyaspeeth@prahaar.co.in

प्रहार कॉलेज अंतरंग

रविवार, २० ऑक्टोबर २०२४

प्रवीण दवणे : विशेष : रंगभूमीवरचा प्राजक्त गळाला...
डॉ. वीणा खाडिलकर : विशेष : जावे स्त्री संतांच्या गावी
सुजाता पाटील :
राजश्री वटे : हलकं-फुलकं : चंदा ओ चंदा...
भालचंद्र ठोंबरे : विशेष : सात्यकी
स्वाती गानू : आनंदी पालकत्व : विद्यार्थ्यांचे प्रश्न आणि त्यावर उपाययोजना
लता गुठे : विशेष : क्रांती लढ्यातील राणी चेन्नम्मा
श्रीनिवास बेलसरे : नॉस्टॅल्जिया : 'ऐ मोहब्बत तेरे अंजामपे..'
पूर्णिमा शिंदे : मनस्विनी : दाम करी काम
ॲड. रिया करंजकर : क्राइम : बाईकच्या मागे धावला श्वान
मंगेश महाडिक : राशिभविष्य
काव्यरंग :
प्रा. देवबा पाटील : कथा : पापण्यांची उघडझाप
रमेश तांबे : कथा : चला खेळूया!
प्रतिमा सराफ : प्रतिभारंग : पुरस्कार
एकनाथ आव्हाड : काव्यकोडे, कविता : आमच्या मुळेबाई
डॉ. विजया वाड : नक्षत्रांचे देणे :

मुंबई, नाशिक, रत्नागिरी, सिंधुदुर्ग येथून एकाच वेळी प्रसिद्ध

www.prahaar.in, epaper.prahaar.in

अॅथलेटिक्स स्पर्धेत वीर वाजेकर एएससी कॉलेजची 'सुवर्णपदकाला' गवसणी

◆ उरण (प्रतिनिधी) :

मुंबई विद्यापीठांतर्गत अॅथलेटिक्स स्पर्धांचे आयोजन मुंबई विद्यापीठ क्रीडा संकुल मरीन लाईन्स मुंबई येथे १६ व १७ ऑक्टोबर २०२४ रोजी पार पडल्या. रयत शिक्षण संस्थेच्या फुंडे, उरण येथील वीर वाजेकर कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

या अॅथलेटिक्स स्पर्धेमध्ये वैयक्तिक १०००० मीटर धावणे आणि ५००० मीटर धावणे स्पर्धेत प्रथम क्रमांक मृणाल मनोहर सरोदे तर १०००० मीटर धावणे स्पर्धेत आणि ३००० मीटर धावणे ट्रिपल चेस स्पर्धेत तृतीय क्रमांक - प्रेम संतोष ठाकुर याने पटकाविला. या यशाबद्दल रयत शिक्षण संस्थेचे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी अभिनंदन केले.

मुंबई रेल्वे विकास कॉर्पोरेशन लिमिटेड

निविदा करिता विनंती

E-Tender No. MRVC-1001622024-STORES

मुंबई रेलवे विकास कॉर्पोरेशन लि. ज्यांचे कॉर्पोरेट कार्यालय दुसरा मजला, चर्चगेट स्टेशन इमारत, मुंबई-४०००२० येथे आहे, यांचे द्वारे **"P Way items - CMS Crossing, Switches, TWSEJ"** साठी ई-निविदा मागविण्यात येत आहेत. निविदाचे तपशील आणि निविदा दस्तावेज ई-प्रोक्योरमेंट वेबसाइट **www.ireps.gov.in** वर उपलब्ध आहेत। पूर्ण भरलेली ई-निविदा वेबसाईट वर जमा करण्याची शेवटची तारीख 05.11.2024 रोजी 11:00 वा. पर्यंत आहे. **शुद्धीपत्र, जर असेल, तर ते फक्त वैबसाईट वर प्रसिद्ध करण्यात येईल.**

https://mrvc.indianrailways.gov.in

IndoStar Home Finance Private Limited

Regd. Office: - Unit No. 305, 3rd Floor, Wing 2/E, Corporate Avenue, Andheri- Ghatkopar Link Road, Chakala, Andheri (East), Mumbai – 400093
CIN : U65990MH2016PTC271587 **Tel:** +91 22 45107701
Email: connect@indostarhfc.com; **Website:** www.indostarhfc.com

सूचना

मास्टर डायरेक्शन – नॉन बँकिंग फायनॅन्शियल कंपनी – हाऊसिंग फायनांस कंपनी (रिझर्व्ह बँक) डायरेक्शन्स २०२१ मधील परिच्छेद ९३ च्या अनुसार सूचना ह्याद्वारे देण्यात येत आहे की **दुकान क्र. १, तळ मजला, बालाजी हाईट बिल्डींग, मौजे भिसेगाव, ता. कर्जत, सिटी सर्वे क्र. ३९/ ए १, कर्जत जिल्हा – रायगड, महाराष्ट्र – ४१०२०१** येथे वसलेली कंपनीचे शाखा कार्यालय **२४ जानेवारी २०२५** रोजी कार्यालयीन कामकाज संपल्यापासून बंद करण्यात येणार आहे. जर कोणतेही सहाय्य पाहिजे असल्यास तुम्ही उपरोक्त नमूद केल्यानुसार नजीकच्या शाखा कार्यालयाशी संपर्क करू शकता किंवा **connect@indostarhfc.com** वर मेल करू शकता.

सदर सूचना कंपनीचे संकेतस्थळ (**www.indostarhfc.com**) वरून देखील प्राप्त करता येईल.

इंडोस्टार होम फायनांस प्रायव्हेट लिमिटेड करीता
सही/-
निधी सदानी
कंपनी सचिव

दिनांक : १८-१०-२०२४

जाहिर नोटीस

तमाम लोकांस जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, आम्ही १) अनमोल गजानन राऊत, २) स्वरांगी अनमोल राऊत खालील वर्णनाची जमीन मिळकत, सदर जमीन मिळकतीचे मालक सुमित संतोष भोसले यांचे हिश्याची जमीन मिळकत त्यांचेकडुन योग्य प्रतिफळापोटी खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित असल्याची सदर जमीन मालक यांनी खरेदी घेणार १) अनमोल गजानन राऊत, २) स्वरांगी अनमोल राऊत खात्री दिली आहे. सदर जमीन मालक यांच्या व्यतिरिक्त सदर जमीन मिळकतीत अन्य कोणत्याही व्यक्तीचा मालकी हक्क, वहिवाट, इमजेंट्स, साठेकरार अगर अन्य प्रकारची हक्क हितसंबंध नसल्याची ग्वाही सदर मिळकत मालकांनी खरेदी घेणार १) अनमोल गजानन राऊत, २) स्वरांगी अनमोल राऊत दिलेली आहे. तरी सदर मिळकतीमध्ये अन्य कोणत्याही व्यक्तीचा वारसा, मालकी हक्क, खरेदी, बक्षिस, गहाण, लिज, साठेकरार, विरूध्द कब्जा, संपादन, इजमेंट्चे हक्क दिवाणी अगर कोणत्याही कोर्टात वाद चालू असल्यास अथवा सदर व्यवहारास हरकत असल्यास अशा व्यक्तींनी त्यांच्या हरकती त्यांचे हक्क, हितसंबंधाबाबतचे प्रथम दर्शनी पुराव्यासह लेखी स्वरूपात खाली सही करणार यांच्याकडे सदर नोटीस प्रसिध्द झालेपासून सात दिवसाचे आत नोंदवाव्यात. सदर मुदतीत कोणाचीही तक्रार उपस्थित न झाल्यास सदर जमीन मिळकतीत काही हक्क हितसंबंध असल्यास ते जाणीवपुर्वक सोडून दिले आहेत असे गृहित धरून खरेदी घेणार १) अनमोल गजानन राऊत, २) स्वरांगी अनमोल राऊत सदर मिळकतीबाबतचा खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मागाहून येणाऱ्या तक्रारीचा विचार केला जाणार नाही हे सर्वांस कळावे.

मिळकतीचे वर्णन

मौजे मिर्ले, ता. खेड जि. रत्नागिरी येथील जमीन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

क्र.	भूमापन क्र व उपविभाग	क्षेत्र हे.आर.	आकार रू.पै.	पैकी क्षेत्र हे.आर
१)	५२/३६	०-२०-०० पो.ख. ०-००-०० ०-२०-००	०.१४	०-०६-६६
२)	५३/२५	०-२६-०० पो.ख. ०-००-०० ०-२६-००	०.१९	०-०८-६६
३)	५३/२३	०-२४-०० पो.ख. ०-०२-०० ०-२६-००	०.१७	०-०८-६६
४)	५३/३०	०-०८-०० पो.ख. ०-००-०० ०-०८-००	०.१४	०-०२-६७
५)	१०७/२६/१	०-३४-४१ पो.ख. ०-०४-५९ ०-३९-००	०.१७	०-१३-००

सही/-

१) अनमोल गजानन राऊत
२) स्वरांगी अनमोल राऊत
रा. रूम नं. ४, कांबळे चाळ, अशोक नगर, दत मंदीर जवळ, भांडुप (पुर्व) मुंबई न. ४०००४२
मो. नं. ९१३७६२५८४६

खेड
दिनांक : १७/१०/२०२४

IndoStar Capital Finance Limited

INDOSTAR

Regd Office: Unit No 301-A, 3rd Floor, Silver Utopia, Opposite P & G Plaza, Cardinal Gracious Road, Chakala, Andheri East, Mumbai - 400099, India
CIN: L65100MH2009PLC268160; **Website:** www.indostarcapital.com; **E:** investor.relations@indostarcapital.com; **Tel:** +91 22 43157000

EXTRACT OF CONSOLIDATED UNAUDITED FINANCIAL RESULTS FOR THE QUARTER AND HALF YEAR ENDED 30 SEPTEMBER 2024

(INR in Lakhs)

Sr. No.	Particulars	Quarter ended		Half Year ended		Year ended
		30 September 2024 (Unaudited)	30 September 2023 (Unaudited)	30 September 2024 (Unaudited)	30 September 2023 (Unaudited)	31 March 2024 (Audited)
1	Revenue from operations (including other income)	35,207	23,432	66,105	47,424	1,10,712
2	Profit/(loss) before tax from continuing operations	1,786	964	2,856	4,044	7,026
3	Profit/(loss) after tax from continuing operations	1,784	964	2,853	4,044	7,022
4	Profit/(loss) after tax from discontinuing operations	1,384	1,513	2,808	2,326	4,562
5	Profit/(loss) after tax	3,168	2,477	5,661	6,370	11,584
6	Total comprehensive Income (Comprising profit/(loss) after tax for the period and other comprehensive income after tax)	3,121	2,482	5,559	6,339	11,552
7	Paid up equity share capital (Face value of INR 10/- each)	13,608	13,608	13,608	13,608	13,608
8	Reserves (excluding Revaluation Reserve) as shown in the Audited Balance Sheet					3,09,914
9	Earnings per share (* not annualised)					
	Continuing operations:					
	Basic (Rs.)	*1.31	*0.78	*2.10	*3.05	5.16
	Diluted (Rs.)	*1.31	*0.78	*2.09	*3.05	5.16
	Discontinued operations:					
	Basic (Rs.)	*1.02	*1.04	*2.06	*1.63	3.35
	Diluted (Rs.)	*1.01	*1.04	*2.05	*1.63	3.35
	Total					
	Basic (INR)	*2.33	*1.82	*4.16	*4.68	8.51
	Diluted (INR)	*2.32	*1.82	*4.14	*4.68	8.51

a. The above is an extract of detailed format of unaudited consolidated financial results for the quarter and half year ended 30 September 2024, prepared pursuant to Regulation 33 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015. The full format of the unaudited standalone financial results and unaudited consolidated financial results are available on the website of the Company at **www.indostarcapital.com** and on the websites of the BSE Ltd. at **www.bseindia.com** and the National Stock Exchange of India Ltd. at **www.nseindia.com**.

The key information of the unaudited standalone financial results of the Company are given below:

(INR in Lakhs)

Sr. No.	Particulars	Quarter ended		Half Year ended		Year ended
		30 September 2024 (Unaudited)	30 September 2023 (Unaudited)	30 September 2024 (Unaudited)	30 September 2023 (Unaudited)	31 March 2024 (Audited)
1	Revenue from operations (including other income)	35,370	24,441	66,430	48,737	1,12,523
2	Profit / (loss) before tax	1,797	1,051	2,876	4,142	7,161
3	Profit / (loss) after tax	1,797	1,051	2,876	4,142	7,161
4	Total comprehensive Income	1,751	1,055	2,781	4,117	7,137

b. Figures for the previous periods / year have been regrouped, and / or reclassified wherever considered necessary to make them comparable to the current periods / year presentation.

c. The Board of Directors of the Company in its meeting held on 19 September 2024 had considered and approved, inter-alia, subject to shareholders, regulatory and other approvals, sale of the Company's shareholding in IndoStar Home Finance Private Limited ("IHFPL"), a debt-listed material subsidiary of the Company, to WITKOPEEND B.V. (the "Purchaser") for an aggregate consideration of Rs. 170,595 lakhs in accordance with the terms of the share purchase agreement dated 19 September 2024 among the Company, IHFPL and the Purchaser.

The assets and liabilities of IHFPL has been disclosed as "Non-current asset held for sale", "Liabilities for assets held for sale" and discontinued operations in the financial results in accordance with Ind-AS 105 - Non-current Assets Held for Sale and Discontinued Operations.

For and on behalf of the Board of Directors of
IndoStar Capital Finance Limited

Karthikeyan Srinivasan
Chief Executive Officer & Whole Time Director
DIN: 10056556

Place : Mumbai
Date : 18 October, 2024